दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

1,22,570
डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील लोकप्रिय दैनिक

• वर्ष : ०४ • अंक : ०३५ • पुणे • गुरूवार, दि. १५ ऑक्टोबर २०२६ • मराठी दैनिक •पाने ४ •किंमत : २ रूपये •RNI No.-MAHMAR/2023/89313





दैनिक
आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा

# राज्यस्तरीय नवदुर्गा पुरस्कार २०२६

यशस्विनी विकास प्रतिष्ठान
यशस्वी, स्वच्छंदी, भरारी
पुर्ननिर्मितीतुन प्रगतीकडे...!
पुणे प्रहार
www.puneprahar.com

यशस्विनी विकास प्रतिष्ठान, पुणे आणि पुणे प्रहार यांच्या संयुक्त विद्यमाने

दैनिक आरंभ पर्व, पुणेच्या वतीने नवरात्रीनिमित्त समाजातील विविध क्षेत्रांत आपल्या कर्तृत्वाची अमीट छाप उमटविणाऱ्या कर्तृत्ववान महिला दुर्गांचा विशेष सन्मान!

## प्रमुख उपस्थिती



सौ.मंजुषाताई नागपुरे
महापौर, पुणे



सौ.तृप्तीताई देसाई
(सामाजिक कार्यकर्त्या)



सौ. सुनिता डांगे
(संस्थापिका यशस्विनी विकास प्रतिष्ठान)

## विशेष आकर्षण



मोनालीसा बागल
(अभिनेत्री )



मयुरी नव्हाते
(अभिनेत्री, मॉडेल, अँकर)

स्थळ : सिल्वर पेटल्स हॉल, लाडली साडी सेंटरजवळ, धायरी फाटा, सिंहगड रोड, पुणे.
रविवार दिनांक 18 ऑक्टोंबर 2026 - वेळ : सायंकाळी 4 ते 8

अधिक माहितीसाठी : 7276314142 / 8605284272

# नवरात्रोत्सव : स्त्रीशक्तीचा जागर केवळ उत्सवापुरता नको, तर कृतीतूनही दिसू द्या!

संपादकीय
विचार आजचा... दिशा उद्याची...

- आदिशक्तीचा जयघोष करताना स्त्रीच्या सन्मानाचा संकल्प करूया!

भारतीय संस्कृतीत नवरात्रोत्सवाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. शक्ती, भक्ती, श्रद्धा आणि चैतन्याचा संगम असलेला हा उत्सव केवळ धार्मिक परंपरेचा भाग नसून, तो स्त्रीशक्तीच्या सामर्थ्याची जाणीव करून देणारा महत्त्वपूर्ण सोहळा आहे. दुर्गा, लक्ष्मी आणि सरस्वती या देवींच्या विविध रूपांची आराधना करताना आपण शक्ती, समृद्धी आणि ज्ञान यांचा गौरव करतो. मात्र, या उत्सवाचे खरे सार केवळ देवीच्या पूजेत नसून, समाजातील प्रत्येक स्त्रीला सन्मानाने जगण्याचा अधिकार देण्यात आहे.

आज देशाच्या प्रगतीत महिलांचे योगदान अत्यंत मोलाचे आहे. शिक्षण, विज्ञान, उद्योग, शेती, प्रशासन, क्रीडा, कला, साहित्य आणि राजकारण अशा विविध क्षेत्रांत महिलांनी आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवला आहे. प्रतिकूल परिस्थितीवर मात करत अनेक महिलांनी यशाची शिखरे गाठली आहेत. कुटुंबाची जबाबदारी सांभाळतानाच सामाजिक परिवर्तनासाठी पुढाकार घेणाऱ्या असंख्य महिला आज समाजाला नवी दिशा देत आहेत. त्यांच्या या कर्तृत्वाचा गौरव करणे म्हणजेच खऱ्या अर्थाने स्त्रीशक्तीचा सन्मान करणे होय.

मात्र, एकीकडे देवीच्या आराधनेत रमणारा समाज आणि दुसरीकडे महिलांवरील अत्याचार, छेडछाड, हुंडाबळी, कौटुंबिक हिंसाचार, स्त्रीभ्रूणहत्या तसेच मुलींच्या शिक्षणातील अडथळे ही वास्तवातील कटू चित्रे आजही दिसून येतात. ही विसंगती अंतर्मुख करणारी आहे. ज्या समाजात स्त्रीला आदिशक्तीचे रूप मानले जाते, त्याच समाजात तिच्या सुरक्षिततेसाठी स्वतंत्र संघर्ष करावा लागतो, ही खेदाची बाब आहे.

नवरात्रोत्सवाच्या निमित्ताने या प्रश्नांचा गांभीर्याने विचार होणे आवश्यक आहे. देवीसमोर नतमस्तक होताना आपल्या घरातील मुलीला समान संधी देण्याचा संकल्प आपण करतो का? महिलांच्या निर्णयस्वातंत्र्याचा आदर करतो का? मुलगा आणि मुलगी यांच्यातील भेदभाव दूर करण्यासाठी प्रयत्न करतो का? सार्वजनिक ठिकाणी महिलांची सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी पुढाकार घेतो का? या प्रश्नांची प्रामाणिक उत्तरे शोधली, तरच नवरात्रोत्सवाच्या उत्सवाला सामाजिक परिवर्तनाची जोड मिळेल.

स्त्रीशक्तीचा सन्मान भाषणांतून नव्हे, तर कृतीतून झाला पाहिजे. मुलींच्या शिक्षणाला प्राधान्य, महिलांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनविणे, त्यांच्या कर्तृत्वाला योग्य संधी उपलब्ध करून देणे आणि अन्यायाविरुद्ध ठामपणे उभे राहणे, ही काळाची गरज आहे. महिलांना केवळ संरक्षणाची गरज असलेल्या व्यक्ती म्हणून न पाहता, समाजाच्या विकासातील समान भागीदार म्हणून स्वीकारले पाहिजे.

आजच्या काळात नवरात्रोत्सवाचे स्वरूपही बदलत आहे. सार्वजनिक मंडळे, सांस्कृतिक कार्यक्रम, सामाजिक उपक्रम आणि विविध पुरस्कार सोहळ्यांच्या माध्यमातून महिलांच्या कर्तृत्वाचा गौरव केला जात आहे. अशा उपक्रमांना केवळ औपचारिकतेपुरते मर्यादित न ठेवता, समाजातील दुर्लक्षित आणि संघर्षमय जीवन जगणाऱ्या महिलांना प्रोत्साहन देण्याचे माध्यम बनवले पाहिजे. ग्रामीण भागातील महिला, शेतकरी महिला, कष्टकरी माता, उद्योजिका, शिक्षिका, परिचारिका, सामाजिक कार्यकर्त्या आणि विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचे योगदान समाजासमोर आले पाहिजे. नवरात्र म्हणजे वाईट प्रवृत्तींवर चांगल्या प्रवृत्तींचा विजय. महिषासुराचा वध ही केवळ पौराणिक कथा म्हणून न पाहता, आजच्या काळातील अन्याय, अंधश्रद्धा, भेदभाव, हिंसाचार आणि स्त्रीद्वेष यांच्याविरुद्धच्या लढ्याचे प्रतीक म्हणूनही पाहण्याची गरज आहे. प्रत्येक घरात मुलीला सन्मान, प्रत्येक कार्यक्षेत्रात महिलेला समान संधी आणि प्रत्येक समाजात स्त्रीला सुरक्षित वातावरण मिळाले, तरच या उत्सवाचा संदेश प्रत्यक्षात उतरेल. नवरात्रोत्सव हा केवळ नऊ दिवसांचा उत्सव नाही; तो वर्षभर स्त्रीचा सन्मान करण्याची प्रेरणा देणारा विचार आहे. देवीच्या चरणी अर्पण केलेली फुले, केलेली आरती आणि घेतलेले दर्शन यांना तेव्हाच खरा अर्थ प्राप्त होईल, जेव्हा आपल्या वर्तनातून महिलांप्रती आदर व्यक्त होईल. चला, यंदाच्या नवरात्रोत्सवात एक नवा संकल्प करूया देवीची पूजा करूया, पण स्त्रीचा अपमान सहन करणार नाही; मुलींचे शिक्षण घडवूया, महिलांना स्वावलंबी बनवूया आणि त्यांच्या कर्तृत्वाला सन्मान देऊया.

कारण, ज्या समाजात स्त्री सुरक्षित, सन्मानित आणि सक्षम असते, तोच समाज खऱ्या अर्थाने प्रगत होतो. आदिशक्तीचा जागर मंदिरापुरता मर्यादित न राहता प्रत्येक घरात, प्रत्येक मनात आणि प्रत्येक कृतीत उमटला, तरच नवरात्रोत्सवाची खरी सार्थकता साध्य होईल. स्त्रीचा सन्मान, समाजाचा अभिमान; स्त्रीशक्तीचा जागर, प्रगत समाजाचा आधार!

# माणसांमध्ये असूनही जाणवणारे 'एकटेपण' चिंतेची बाब

## विजया रहाटकर यांचे प्रतिपादन; उमरजी मदर अँड चाईल्ड केअरतर्फे 'अनुबंध' आधारगटाचे उद्घाटन




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

"आजूबाजूला माणसांची खूप गर्दी, सोशल मीडियात सक्रिय असूनही, जाणवणारे 'एकटेपण' ही चिंतेची बाब आहे. मनातील दुःख व्यक्त करण्यासाठी आणि आपले म्हणणे समजून घेणारी व्यक्ती शोधण्यासाठी अनेकांना संघर्ष करावा लागतो. अशा परिस्थितीत दुःखातून गेलेल्या व्यक्तींना एकत्र आणून त्यांचे अनुभव ऐकून घेणारे आणि त्यांना भावनिक आधार देणारे व्यासपीठ उभारणे महत्त्वाचे आहे. या एकटेपणावर मात करण्यासाठी 'अनुबंध'सारखे आधारगट निर्माण व्हायला हवेत," असे प्रतिपादन राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी केले.

बालेवाडी येथील उमरजी मदर अँड चाईल्ड केअर हॉस्पिटलच्या गर्भहानी व बालवियोग अनुभवलेल्या कुटुंबांसाठी सुरु करण्यात आलेल्या 'अनुबंध' या आधारगटाच्या उद्घाटनाप्रसंगी रहाटकर बोलत होत्या. यावेळी व्यासपीठावर ज्येष्ठ लेखक, विचारवंत व तंत्रज्ञान अभ्यासक अच्युत गोडबोले, डॉ. प्रमोद उमरजी, डॉ. मुक्ता उमरजी, डॉ. चिन्मय उमरजी, डॉ. केतकी उमरजी, सौ. प्रियांका उमरजी आदी उपस्थित होते. 'वेदनेतून संवेदनेकडे... संवेदनेतून आधाराकडे' अशी या आधारगटाची मूळ संकल्पना आहे. त्याअंतर्गत 'उपचारांपलीकडची जबाबदारी - विज्ञान, संवेदना आणि सामाजिक भान' या विषयावर अच्युत गोडबोले यांचे विशेष व्याख्यान झाले. विजया रहाटकर म्हणाल्या, "अनेक पालकांना आपल्या मुलाला गमावण्याचे दुःख सहन करावे लागते. अशा कुटुंबांच्या वेदना समाजाला नेहमीच समजतात, असे नाही. त्यांच्याशी नेमके कसे बोलावे, कसे वागावे आणि त्यांना आधार कसा द्यावा, याबाबत समाजात पुरेशी जाणीव नसते. दुःखात असलेल्यांच्या भावना समजून घेऊन त्यांचा आदर करणे, ही सामाजिक संवेदनशीलतेची महत्त्वाची कसोटी आहे. सध्या आपल्या आजुबाजूला शेकडो जणांना विविध कारणांनी मानसिक आधाराची गरज असल्याचे दिसते. अशा लोकांना समजून घेण्यासोबतच त्यांचे ऐकण्याची सर्वाधिक गरज आहे. महिलांच्या आरोग्याकडे विशेष लक्ष द्यायला हवे, ती कुटुंबाचा आधार असल्याने तिचे आरोग्य उत्तम तर कुटुंब चांगले राहू शकेल." अच्युत गोडबोले म्हणाले, "पूर्वीच्या काळात एकत्र कुटुंबपद्धती आणि सामाजिक संबंधांमुळे माणसाला सुरक्षिततेची भावना होती; मात्र त्याच्या वैयक्तिक स्वातंत्र्यावर काही मर्यादा होत्या. औद्योगिकीकरणानंतर माणसाला अधिक स्वातंत्र्य मिळाले, परंतु पारंपरिक सामाजिक आधारव्यवस्था कमकुवत झाल्याने एकटेपणा वाढला. आज सोशल मीडियावर हजारो मित्र असले, तरी मनातील भावना व्यक्त करण्यासाठी आणि अडचणीच्या वेळी आधार घेण्यासाठी जवळची व्यक्ती नाही. गर्दीतही एकटेपणा अनुभवण्याची ही समस्या गंभीर बनत आहे. त्यामुळे व्यक्तींना एकत्र आणणारे आणि परस्पर संवादाला प्रोत्साहन देणारे आधारगट आज पूर्वीपेक्षा अधिक आवश्यक आहेत." डॉ. चिन्मय उमरजी यांनी स्वागतपर प्रास्ताविकात या कार्यक्रमामागची भूमिका स्पष्ट केली. ते म्हणाले, "आपल्याकडे आजही गर्भधारणेच्या बाबतीत स्त्रीला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले जाते. मात्र तिच्याकडे माणूस म्हणून पाहणे अतिशय गरजेचे आहे. तिच्या मनाचा, भावनेचा विचार व्हायला हवा. बालवियोग झाल्यानंतर महिलेला शारीरिक आधार तर गरजेचा असतोच; पण मानसिक आणि भावनिकदृष्ट्या तिला सोबतीची किंवा आधाराची अधिक गरज असते. त्याच विचाराने शासनातर्फे राबविल्या जाणाऱ्या प्रेग्नन्सी अँड इन्फंट लॉस अवेअरनेस (पेल) या उपक्रमाअंतर्गत 'अनुबंध' हा आधारगट सुरू केला आहे." भारतात दरवर्षी सहा लाखांहून अधिक बाळे पहिल्या वाढदिवसापूर्वीच दगावतात, सुमारे तीन लाख बाळांचा जन्मापूर्वीच मृत्यू होतो, आणि ज्ञात गर्भधारणांपैकी सुमारे दहा ते पंधरा टक्के गर्भधारणा गर्भपातात संपतात. अशा माता आणि कुटुंबांना या मानसिक आघाताला सामोरे जाणे खूप कठीण असते.

अशा वेळी समाज म्हणून आपला दृष्टिकोन कसा असावा, कोणते प्रश्न विचारावेत आणि कोणते टाळावेत, याबद्दल जनजागृती करण्यासाठी आणि अशा कुटुंबांना आधार देण्यासाठी उमरजी मदर अँड चाईल्ड केअर हॉस्पिटलने पुढाकार घेतला आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे



उर्मिला पवार | दत्ताजी गायकवाड | अशोक गोपाल | दत्तात्रेय काळेबेरे

### फुले-आंबेडकरी चळवळीतील ज्ञानवंतांचा सोमवारी सन्मान

- डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ आणि 'लोकशाहीसाठी समंजस संवाद' यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजन

**पुणे (आरंभ पर्व) :** महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांनी प्रेरित होऊन सामाजिक परिवर्तनासाठी योगदान देणाऱ्या मान्यवरांचा सन्मान करण्यात येणार आहे. डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ, पिंपरी-पुणे आणि 'लोकशाहीसाठी समंजस संवाद', पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने 'महात्मा फुले-डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रेरणा सन्मान सोहळा' आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती संयोजक अरुण खोरे यांनी दिली आहे. या सोहळ्यात ज्येष्ठ लेखिका उर्मिला पवार (मुंबई), आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ कार्यकर्ते दत्ताजी गायकवाड (सोलापूर), ज्येष्ठ पत्रकार व लेखक अशोक गोपाल (पुणे) आणि सामाजिक कार्यकर्ते दत्तात्रेय काळेबेरे (पुणे) यांना सन्मानित करण्यात येणार आहे. डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाचे कुलपती डॉ. पी. डी. पाटील यांच्या हस्ते, हिंदी भाषेचे ज्येष्ठ विद्वान आणि लेखक डॉ. दामोदर खडसे यांच्या अध्यक्षतेखाली येत्या सोमवारी (ता. १२) सायंकाळी ५ वाजता एस. एम. जोशी फाउंडेशनचे सभागृह, नवीपेठ, पुणे येथे हा सोहळा होणार आहे. उर्मिला पवार यांनी मराठी साहित्यात मोलाचे योगदान दिले असून, त्यांचे 'आयदान' हे आत्मचरित्र विशेष गाजले आहे. आंबेडकरी आणि स्त्रीवादी चळवळीतील त्यांच्या कार्याची दखल घेतली जाते. दत्ताजी गायकवाड हे गेल्या सहा-सात दशकांपासून आंबेडकरी चळवळ आणि सामाजिक परिवर्तनाच्या विविध आघाड्यांवर कार्यरत आहेत. ज्येष्ठ पत्रकार अशोक गोपाल यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनकार्यावर संशोधनपर लेखन केले आहे. त्यांच्या 'अ पार्ट अपार्ट: लाईफ अँड थॉट ऑफ डॉ. आंबेडकर' या ग्रंथाला राष्ट्रीय स्तरावरील पुरस्कार मिळाला आहे. दत्तात्रेय काळेबेरे हे ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ. बाबा आढाव यांचे दीर्घकाळ सहकारी असून, समतेच्या चळवळीत त्यांचे महत्त्वपूर्ण योगदान आहे.

# फुले-आंबेडकरांचा सामाजिक समतेचा विचार पुढे नेणे ही काळाची गरज

## डॉ. पी. डी. पाटील यांचे प्रतिपादन; डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ आणि 'लोकशाहीसाठी समंजस संवाद'तर्फे ज्ञानवंतांचा सन्मान

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

"आज शिक्षणाच्या बळावर महिला सर्वच क्षेत्रांत पुरुषांच्या बरोबरीने प्रगती करत आहेत. त्यांच्या या प्रगतीचा पाया महात्मा जोतिराव फुले आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांनी घातला, याचे भान समाजाने ठेवले पाहिजे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी गौतम बुद्ध, संत कबीर आणि महात्मा फुले यांना आपले महान गुरू मानले होते. सामाजिक समता, शिक्षण आणि मानवमुक्तीसाठी फुले-आंबेडकरांनी केलेले कार्य आधुनिक भारताच्या जडणघडणीत महत्त्वपूर्ण ठरले आहे. त्यांच्या कार्याचे स्मरण करून सामाजिक समतेचा हा विचार पुढे नेणे ही काळाची गरज आहे," असे प्रतिपादन डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाचे कुलपती डॉ. पी. डी. पाटील यांनी केले.

डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ आणि 'लोकशाहीसाठी समंजस संवाद' यांच्या संयुक्त विद्यमाने 'महात्मा फुले-डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रेरणा सन्मान' सोहळ्यात ते बोलत होते. महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांनी प्रेरित होऊन सामाजिक परिवर्तनासाठी योगदान देणाऱ्या मान्यवरांचा यावेळी सन्मान करण्यात आला. स्मृतिचिन्ह, पुष्पगुच्छ, शाल, फुले पगडी असे पुरस्काराचे स्वरूप होते. ज्येष्ठ लेखिका उर्मिला पवार (मुंबई), आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ कार्यकर्ते दत्ताजी गायकवाड (सोलापूर), ज्येष्ठ पत्रकार व लेखक अशोक गोपाल (पुणे) आणि सामाजिक कार्यकर्ते दत्तात्रेय काळेबेरे (पुणे) यांना सन्मानित करण्यात आले. नवी पेठेतील एस. एम. जोशी फाउंडेशनच्या सभागृहात झालेल्या सोहळ्यावेळी डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाचे कुलपती डॉ. पी. डी. पाटील, हिंदी भाषेचे ज्येष्ठ विद्वान आणि लेखक डॉ. दामोदर खडसे, 'लोकशाहीसाठी समंजस संवाद'चे संपादक व ज्येष्ठ पत्रकार अरुण खोरे, सल्लागार विजय जाधव उपस्थित होते. डॉ. दामोदर खडसे म्हणाले, "देशभरातील दलित साहित्याच्या निर्मितीचे श्रेय हे मराठी भाषा आणि महाराष्ट्राला जाते. त्यानंतर देशभरातील विविध भागातून दलित साहित्य लिहीले गेले. दया पवार हे या साहित्यातील एक महत्त्वाचे नाव असून, त्यांनी दलित साहित्यात महत्त्वाचे योगदान दिले आहे. 'बलुतं' या कादंबरीच्या संपूर्ण प्रवासाचा साक्षीदार आहे. त्यानंतर दलित साहित्यात बरेच लिखाण झाले. फुले आणि आंबेडकर यांच्या कार्यावरही मोठ्या प्रमाणात लिखाण झाले, पण आजच्या घडीला लिखाणातून समाजात खरंच परिवर्तन झाले का हा प्रश्न कायम आहे. हे परिवर्तन झाले नसेल, तर आपल्याला अजूनही काम करण्याची आवश्यकता आहे, हेच यातून दिसून येते." उर्मिला पवार म्हणाल्या, "प्रश्न विचारायचे धाडस बाबासाहेबांमुळे आले. आपल्या समाजातील बायकांचा संघर्ष समाजासमोर आला पाहिजे, यासाठी लिखाण सुरू केले. गेल्या काही वर्षात नरेंद्र दाभोळकर, गोविंद पानसरे, कलबुर्गी अशा कार्यकर्त्यांचे खून झाले, ही मन विषण्ण करणारी बाब आहे. एकीकडे निराशाजनक परिस्थिती असताना आता 'जेन-झी'ने केलेल्या जनआंदोलनातून आश्वासक चित्र उभे राहिले आहे. सत्याचा, समतेचा आवाज उठवत राहण्याची गरज आहे."



> अशोक गोपाल म्हणाले, "माणूस मरतो त्याप्रमाणे विचार मरतात; पण आपल्याला लिखाण येते तर आपण माणसाविषयी लिहून ठेवायला हव म्हणून लिखाण केले. दलित मराठी साहित्याशी संबंध आला आणि फुले-आंबेडकराविषयी वाचनात आले आणि लिखाणाला सुरुवात झाली. लेखनाच्या माध्यमातून बाबासाहेबांचे विचार जिवंत ठेवण्याचा प्रयत्न करतो आहे."

दत्तात्रय काळेबेरे म्हणाले, "लहानपणापासून आपण चळवळीत सहभाग घेतला. परीवर्तनाची चळवळ हेच आपले ध्येय असायला हवे, हा विचार त्यामागे होता. बाबासाहेबांचे विचार आणि बाबा आढाव यांच्या कार्याचा आदर्श हीच माझ्या कामाचे प्रेरणा आहे. बाबांनी हाती घेतलेले कार्य सोपे नव्हते, त्यामध्ये खूप संघर्ष होता. जातीयवाद, परित्यक्ता, एक गाव एक पाणवठा, देवदासी मुक्ती आंदोलन यांसारख्या चळवळीत मला सहभागी होता आल्याचे समाधान आहे."

# सौर ऊर्जेच्या प्रसारासाठी 'सौर संवाद २०२६' यात्रेचे आयोजन

GK ENERGY जीके एनर्जी लि. PRESENTS सौर संवाद
Empowering Entrepreneurs. Powering Partnerships.
A Gopal Kabra Foundation Intiative

- गोपाल काबरा फाउंडेशन व जीके एनर्जी यांचा संयुक्त उपक्रम; यात्रेतून १४ जिल्ह्यात साधणार संवाद

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

सौर ऊर्जेबाबत जनजागृती करण्यासह या क्षेत्रातील उद्योजकता आणि रोजगाराच्या संधी ग्रामीण भागापर्यंत पोहोचविण्यासाठी गोपाल काबरा फाउंडेशन आणि जीके एनर्जी लिमिटेड यांच्या संयुक्त विद्यमाने 'सौर संवाद २०२६' यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. दि. १२ ते १८ ऑक्टोबर २०२६ यादरम्यान होणाऱ्या या यात्रेचा शुभारंभ सोमवारी (दि. १२) सकाळी ९.३० वाजता अहिल्यानगर येथून होणार आहे. महाराष्ट्रातील १४ शहरांमध्ये ही यात्रा पोहोचणार असून, त्यामध्ये अहिल्यानगर, संभाजीनगर, नाशिक, धुळे, बुलढाणा, अमरावती, भंडारा, चंद्रपूर, वाशीम, नांदेड, लातूर, सोलापूर, कोल्हापूर, पुणे या जिल्ह्यात जनजागृती करणार आहे. राज्यातील ३४ जिल्ह्यांतील इच्छुक उद्योजकांना जोडण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. सौर ऊर्जेचा वापर केवळ वीज निर्मितीपुरता मर्यादित न ठेवता त्यातून स्थानिक व्यवसाय, रोजगार आणि आर्थिक संधी निर्माण करणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. विशेषतः युवक आणि महिलांना सौर ऊर्जा क्षेत्रातील व्यवसायाच्या संधींची माहिती देऊन त्यांना उद्योजकतेसाठी प्रोत्साहित केले जाणार आहे. एक हजारांहून अधिक इच्छुक उद्योजकांना सक्षम करण्याचे उद्दिष्ट या उपक्रमाने ठेवले आहे. केंद्र सरकारने व महाराष्ट्र सरकारने सौर ऊर्जेच्या वापरासाठी प्रोत्साहनपर अनेक योजना हाती घेतल्या आहेत. त्यालाही या यात्रेमुळे चालना मिळणार आहे, असे जीके एनर्जी लिमिटेडचेअरमन व व्यवस्थापकीय संचालक गोपाल काबरा यांनी सांगितले. घरगुती छतावरील (रुफटॉफ) सौर यंत्रणा, व्यावसायिक सौर प्रकल्प, सौर कृषिपंप, ऊर्जा साठवण, यंत्रणा बसविणे, देखभाल आणि वितरण अशा विविध क्षेत्रांतील संधींची माहिती यात्रेदरम्यान दिली जाणार आहे. तसेच विक्री, सेवा आणि तांत्रिक कामांसाठी स्थानिक पातळीवर व्यवसाय कसा सुरू करता येईल, याबाबत व्यावहारिक मार्गदर्शन केले जाईल.

# सिंधुताईंच्या सेवेचा वारसा जपत 'सूर्योदय वृद्धाश्रम' ठरतोय निराधार ज्येष्ठांचा हक्काचा आधार!

## एका आजीपासून सुरू झालेला प्रवास ३२ आजी-आजोबांपर्यंत; छाया भगत यांचा सेवाभावी उपक्रम

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

आयुष्याच्या संध्याकाळी मायेचा हात, प्रेमाचे दोन शब्द आणि सन्मानाने जगण्याची संधी मिळावी, ही प्रत्येक ज्येष्ठ नागरिकाची अपेक्षा असते. मात्र, बदलत्या सामाजिक परिस्थितीत अनेक ज्येष्ठ नागरिकांना एकाकीपणा आणि निराधारपणाचा सामना करावा लागतो. अशा वेळी ज्येष्ठांच्या आयुष्यात मायेची ऊब निर्माण करत त्यांना कुटुंबाचा आधार देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य धायरी येथील 'सूर्योदय वृद्धाश्रम' करत आहे. 'अनाथांची माय' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सिंधुताई सपकाळ यांच्या मानवतावादी विचारांचा वारसा जपत संस्थेच्या संचालिका छाया भगत यांनी अनेक ज्येष्ठांच्या आयुष्यात आशेचा नवा किरण निर्माण केला आहे.



• छायाताई भगत •
सूर्योदय वृद्धाश्रम, पोकळे वस्ती,धारेश्वर मंदिरा जवळ, धायरी पुणे
फोन नंबर 9881899732 /9921912727

"माईंची अपूर्ण राहिलेली इच्छा पूर्ण करण्याचे भाग्य मला लाभले, यापेक्षा मोठा आनंद नाही," या शब्दांत छाया भगत यांनी आपल्या कार्यामागील भावना व्यक्त केल्या.

सिंधुताई सपकाळ यांच्या मानसकन्या असलेल्या छाया भगत यांनी त्यांच्या समाजसेवेच्या विचारांतून प्रेरणा घेत निराधार ज्येष्ठ नागरिकांच्या सेवेला प्राधान्य दिले. सन २०१३ मध्ये संस्थेची स्थापना झाली. त्यानंतर २०२० मध्ये धायरी येथील डीएसके चौक परिसरात भाड्याच्या एका वन बीएचके घरातून सूर्योदय वृद्धाश्रमाच्या प्रत्यक्ष कार्याला सुरुवात झाली. अवघ्या एका आजीच्या सेवेतून सुरू झालेला हा प्रवास आज ३२ आजी-आजोबांपर्यंत पोहोचला आहे.

हा प्रवास केवळ वृद्धाश्रम उभारण्याचा नाही, तर ज्येष्ठांना आपलेपणाची जाणीव करून देण्याचा आहे. रक्ताच्या नात्यांपलीकडेही माणुसकीचे नाते जपता येते, याची प्रचिती सूर्योदय वृद्धाश्रमातील सेवेतून येते.

वृद्धाश्रमातील आजी-आजोबांचा दिवस केवळ खाणे-पिणे आणि विश्रांतीपुरता मर्यादित राहत नाही. त्यांच्या शारीरिक, मानसिक आणि भावनिक आरोग्याची काळजी घेण्याचा प्रयत्न येथे केला जातो.

सकाळी शक्य असलेल्या ज्येष्ठांसाठी चालणे आणि व्यायाम, त्यानंतर चहा-कॉफी, वैयक्तिक स्वच्छता आणि नाश्ता असा दिनक्रम असतो. वर्तमानपत्र वाचन, पुस्तकांचे वाचन, देवाची स्तोत्रे, गप्पागोष्टी, कॅरम, बौद्धिक खेळ आणि एकमेकांना पुस्तके वाचून दाखविणे अशा उपक्रमांतून त्यांचा वेळ आनंदात जातो.

दुपारच्या जेवणानंतर विश्रांती, तर सायंकाळी भजन, चहा-नाश्ता, हलका व्यायाम, दूरचित्रवाणी, वाचन आणि संवाद असे उपक्रम राबविले जातात. या दिनक्रमामुळे ज्येष्ठांना केवळ निवारा मिळत नाही, तर त्यांच्यात संवाद, सहभाग आणि आपलेपणाची भावनाही वाढीस लागते. समाजसेवेचा वसा स्वीकारलेल्या छाया भगत गेल्या १८ वर्षांपासून घनकचरा व्यवस्थापन क्षेत्रात कार्यरत आहेत. या कामातून मिळणाऱ्या उत्पन्नाचा मोठा भाग त्या वृद्धाश्रमाच्या सेवेसाठी खर्च करतात. समाजातील दानशूर व्यक्तींकडून मिळणारी मदत आणि काही आजी-आजोबांचे त्यांच्या आर्थिक क्षमतेनुसार मिळणारे अल्प योगदान, याच्या बळावर संस्थेचा कारभार सुरू आहे.

मात्र, आजही वृद्धाश्रम भाड्याच्या जागेत सुरू असल्याने आर्थिक मर्यादा जाणवतात. गरजू आणि निराधार ज्येष्ठांना आश्रय देण्याची इच्छा असूनही जागा आणि आर्थिक साधनांच्या मर्यादेमुळे सर्वांनाच सामावून घेणे शक्य होत नाही. त्यामुळे या सेवाकार्याला समाजातील दानशूर व्यक्ती, सामाजिक संस्था आणि मदतीचा हात पुढे करणाऱ्या नागरिकांच्या सहकार्याची गरज आहे. वृद्धापकाळात माणसाला केवळ चार भिंतींचा निवारा पुरेसा नसतो. त्याला हवा असतो संवाद, आपुलकी, सन्मान आणि आपलेपणाचा विश्वास. सूर्योदय वृद्धाश्रम याच भावनेतून ज्येष्ठ नागरिकांच्या आयुष्यात आनंद निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहे. सिंधुताई सपकाळ यांच्या मानवतेच्या विचारांना कृतीची जोड देत छाया भगत आणि त्यांची टीम निराधार ज्येष्ठांच्या जीवनात मायेचा आधार निर्माण करत आहे. एका आजीपासून सुरू झालेला हा प्रवास आज ३२ आजी-आजोबांच्या आयुष्यात आशेचा किरण ठरला आहे. या सेवाकार्याला समाजाची साथ लाभल्यास आणखी अनेक ज्येष्ठांना सन्मानाने आणि आपुलकीने जगण्याची संधी मिळू शकते. कारण, आयुष्याच्या संध्याकाळी ज्येष्ठांना आधार देणे म्हणजे केवळ सेवा नव्हे, तर माणुसकीचे ऋण फेडण्याचा एक सुंदर प्रयत्न आहे.

### "माईंची इच्छा पूर्ण करता आली, हेच माझे भाग्य!"

सिंधुताई सपकाळ यांची आठवण सांगताना छाया भगत भावुक होतात. त्या म्हणतात, "आज माई असत्या, तर त्यांना सर्वाधिक आनंद याच गोष्टीचा झाला असता. वृद्धाश्रम सुरू करण्याची त्यांची इच्छा अपूर्ण राहिली होती. ती पूर्ण करण्याची संधी मला मिळाली, हे माझ्यासाठी मोठे भाग्य आहे." या शब्दांतून त्यांच्या कार्यामागील भावनिक नाते आणि सेवाभाव स्पष्ट होतो. सिंधुताईंच्या विचारांना केवळ शब्दांतून अभिवादन न करता प्रत्यक्ष कृतीतून त्यांचा वारसा पुढे नेण्याचा प्रयत्न छाया भगत करत आहेत.




दैनिक
आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
गुरूवार, दि. १५ ऑक्टोबर २०२६






## पेप्सिको इंडियाच्या उत्पादन पोर्टफोलिओमध्ये परिवर्तन

नवी दिल्ली (आरंभ पर्व) : भारतीय ग्राहकांच्या बदलत्या आवडीनिवडी आणि आरोग्याविषयी वाढती जागरूकता लक्षात घेऊन पेप्सिको इंडियाने आपल्या खाद्यपदार्थ आणि पेय उत्पादनांमध्ये परिवर्तनाची वाटचाल सुरू केली आहे. कमी आणि शून्य साखर असलेली पेये, संपूर्ण धान्यांपासून तयार केलेले पदार्थ, भरडधान्यांवर आधारित स्नॅक्स आणि नावीन्यपूर्ण उत्पादनांच्या माध्यमातून ग्राहकांना अधिक पर्याय उपलब्ध करून देण्यावर कंपनीने भर दिला आहे. ग्राहकांना आवडणारी चव कायम ठेवून उत्पादनांचे घटक, पोषणमूल्ये आणि विविध प्रकारांमध्ये सुधारणा करण्याचे कंपनीचे धोरण आहे. तसेच उत्पादनांच्या पाकिटांवर पोषणमूल्यांची माहिती स्पष्टपणे देऊन ग्राहकांना आपल्या गरजा आणि आवडीनुसार योग्य पर्याय निवडता यावा, यासाठी प्रयत्न केले जात आहेत. पेप्सिको इंडियाच्या पेय व्यवसायात कमी आणि मध्यम उष्मांक असलेल्या उत्पादनांचा वाटा वाढत आहे. कंपनीच्या एकूण पेय उत्पादनांपैकी ७० टक्क्यांहून अधिक उत्पादने शून्य साखर किंवा मध्यम उष्मांक असलेली असल्याचे कंपनीने म्हटले आहे. आगामी काळात हे प्रमाण टप्प्याटप्प्याने ९० ते १०० टक्क्यांपर्यंत नेण्याचे उद्दिष्ट कंपनीने ठेवले आहे. यासाठी पेप्सी ब्लॅक, ७अप झिरो शुगर, गेटोरेड झिरो आणि निंबूझ यांसारख्या पेयांच्या माध्यमातून पर्यायांचा विस्तार केला जात आहे.

## ‘डी बिअर्स इंडिया’कडून नात्याचा नवा अध्याय साजरा



नवी दिल्ली (आरंभ पर्व) : वैवाहिक जीवनात अनेक आनंदाचे प्रसंग येतात. लग्न,लग्नाचा वाढदिवस, मुलांचा जन्म हे अविस्मरणीय क्षण अनुभवायला मिळतात. हे क्षण मोठ्या थाटामाटात आणि उत्साहात साजरे केले जातात. संपूर्ण कुटुंब या आनंदाचा भाग बनते. या अखंड प्रवासात येणा-या एका महत्त्वाच्या टप्प्याबाबत मात्र कोणाचेही लक्ष जात नाही. मुले मोठी झाल्यानंतर शिक्षण, नोकरी-व्यवसायासाठी घराबाहेर जातात. वर्षानुवर्षे मुलांची धावपळ, कलकलाटात व्यस्त असलेले घर अचानकपणे शांत होते. या काळात नवरा-बायकोला उतारवयात पुन्हा नव्याने जगण्याची संधी मिळते. एकमेकांसाठी पुरेसा वेळ मिळतो. मोकळी जागा, स्वातंत्र्य मिळते. आयुष्याचा हा टप्पा एकत्र अनुभवत एकमेकांना नव्याने शोधण्याची सुंदर संधी मिळते. ‘डी बिअर्स इंडिया’ने आयुष्यातील हा टप्प्याला ‘लव्ह, फ्रॉम हबी’ ही नवी ओळख दिली आहे. कंपनीने खास या टप्प्यातील उतारवयातील जोडप्यांसाठी ‘लव्ह, फ्रॉम हबी’ हे अभियान सुरु केले आहे. हे अभियान दांपत्याच्या आयुष्यातील या नव्या आणि सुरेख टप्प्याचा आनंद साजरा करण्याचे निमंत्रण देते. या अभियानांतर्गत १ कॅरेटच्या नैसर्गिक सॉलिटेअर रिंग्सचे खास कलेक्शन लॉंच करण्यात आले आहे. या बदलाचे स्वागत करण्यासाठी पतीकडून पत्नीला हे गिफ्ट देता येईल. या टप्प्यातही पत्नीवरील प्रेम व्यक्त करण्यासाठी ही अर्थपूर्ण भेट ठरेल, असा विश्वास ‘डी बिअर्स इंडिया’कडून व्यक्त करण्यात आला.

## एचडीएफसी बँकेच्या ‘फेस्टिव्ह ट्रीट्स २०२६’ मोहिमेचा शुभारंभ




मुंबई (आरंभ पर्व) : सणासुदीच्या काळात ग्राहकांना खरेदीवर आकर्षक सवलती आणि आर्थिक लाभ मिळवून देण्यासाठी एचडीएफसी बँकेने आपल्या वार्षिक ‘फेस्टिव्ह ट्रीट्स २०२६’ मोहिमेची सुरुवात केली आहे. या मोहिमेंतर्गत देशभरातील ग्राहकांसाठी कर्जे, क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड, बचत व चालू खाती तसेच सुलभ हप्त्यांच्या सुविधांसह १० हजारांहून अधिक आकर्षक ऑफर्स उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. बँकेच्या या उपक्रमामुळे सणासुदीच्या खरेदीत ग्राहकांना अधिक बचत करण्याची संधी मिळणार आहे. यंदाच्या मोहिमेची संकल्पना ‘ट्रीट विथ ऑल युवर हार्ट’ अशी असून, आपल्या प्रियजनांप्रती प्रेम आणि आपुलकी व्यक्त करण्याबरोबरच सणांचा आनंद अधिक उत्साहाने साजरा करण्यावर भर देण्यात आला आहे. ग्राहकांच्या विविध आर्थिक गरजा लक्षात घेऊन बँकेने अनेक वित्तीय उत्पादने आणि सेवांवर विशेष लाभ जाहीर केले आहेत.

# सौ. शिवानी कुणाल वाघुले

# यांना ‘राज्यस्तरीय नवदुर्गा महाराष्ट्र गौरव पुरस्कार’ प्रदान

### भरतनाट्यमसह विविध नृत्यशैलींमध्ये प्रावीण्य; मातृत्वाची जबाबदारी सांभाळत नृत्यसाधना सुरू

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

भारतीय शास्त्रीय नृत्यकलेची परंपरा जपत आपल्या नृत्यकौशल्याच्या जोरावर विविध स्पर्धांमध्ये उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या सौ. शिवानी कुणाल वाघुले (म्हेत्रे) यांना ‘राज्यस्तरीय नवदुर्गा महाराष्ट्र गौरव पुरस्कार’ प्रदान करून गौरविण्यात आले. नृत्यकलेप्रती असलेली निष्ठा, विविध स्पर्धांमधील यश आणि कलाक्षेत्रातील त्यांची वाटचाल यांची दखल घेत त्यांना हा सन्मान प्रदान करण्यात आला.




आपल्या नृत्यप्रवासाला अधिक व्यापक व्यासपीठ मिळावे आणि नृत्यरसिकांशी संवाद साधता यावा, या उद्देशाने त्यांनी तीन महिन्यांपूर्वी ‘dance_journey_withshivani’ हे इन्स्टाग्रामवरील स्वतंत्र पृष्ठ सुरू केले आहे. या माध्यमातून त्या आपल्या नृत्यप्रवासातील अनुभव आणि सादरीकरणे रसिकांपर्यंत पोहोचवत आहेत.

शिवानी वाघुले या पुणे येथील भरतनाट्यम नृत्यांगना असून, त्यांनी गेल्या सात वर्षांपासून नृत्याचे प्रशिक्षण घेत आपल्या कलेला आकार दिला आहे. गुरु प्राजक्ता माळी यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी नृत्यप्रवासाला सुरुवात केली. त्यानंतर गुरु रिद्धी तळेकर यांच्याकडून भरतनाट्यमचे प्रशिक्षण घेतले. विवाहानंतरही नृत्याची आवड कायम ठेवत गुरु स्वरांजली माने यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी आपले अरंगेत्रम पूर्ण केले. या महत्त्वपूर्ण टप्प्यावर त्यांना मानाची ट्रॉफी आणि मानपत्र मिळाले. सन २०२० मध्ये आयोजित ‘पुणे गॉट टॅलेंट’ स्पर्धेत शिवानी यांनी मोठ्या मताधिक्याने विजेतेपद मिळवले. त्यानंतर रंगत संगत प्रतिष्ठानतर्फे त्यांना ‘उत्कृष्ट नृत्यांगना’ हा पुरस्कार आणि पदवी प्रदान करण्यात आली. नांदेड येथे आयोजित ‘क्लासिकल डान्स - जागर स्त्री शक्तीचा’ या स्पर्धेत तब्बल ३७० स्पर्धकांमधून त्यांनी प्रथम क्रमांक पटकावला. या यशाबद्दल त्यांना दोन ट्रॉफी, ‘नृत्याविष्कार’ ही पदवी आणि मानाची ट्रॉफी मिळाली.

मध्य प्रदेशातील उज्जैन येथे झालेल्या शास्त्रीय नृत्य स्पर्धेत २८० स्पर्धकांमधून त्यांनी द्वितीय क्रमांक मिळवला. या स्पर्धेतही त्यांना दोन ट्रॉफी प्रदान करण्यात आल्या. पुण्यातील औंध येथे आयोजित नृत्यस्पर्धेत त्यांनी दोन नृत्यप्रयोग सादर केले. यामध्ये बॉलीवूड नृत्यप्रकारासाठी प्रथम पारितोषिक, तर भरतनाट्यम सादरीकरणासाठी ‘नृत्यविभूती’ ही पदवी आणि मानाची ट्रॉफी मिळाली. याशिवाय ‘नृत्य अनुवाद फॉर भरतनाट्यम’ या कार्यक्रमातील सादरीकरणाबद्दल त्यांना सन्मानचिन्ह प्रदान करण्यात आले. ‘परंपरा’ या शास्त्रीय नृत्य कार्यक्रमातही त्यांनी सादरीकरण करून पदक मिळवले. अभिनेत्री प्राजक्ता माळी यांनी आयोजित केलेल्या ‘ओ उमनिया’ या कार्यक्रमात त्यांनी दोन नृत्यप्रयोग सादर केले असून, त्याबद्दलही त्यांना पारितोषिक मिळाले आहे. सन २०१८ मध्ये नवरात्रोत्सवात नऊ मान्यवर अभिनेत्रींसोबत नृत्यकला सादर करण्याची संधी त्यांना मिळाली होती.

### पती कुणाल वाघुले यांची मोलाची साथ



प्रत्येक यशस्वी पुरुषामागे स्त्रीचा हात असतो, असे म्हटले जाते. मात्र, आपल्या बाबतीत हे वाक्य पूर्णपणे उलट असल्याचे शिवानी सांगतात. आपल्या आजवरच्या यशामागे पती श्री. कुणाल वाघुले यांची मोलाची साथ असल्याचे त्या आवर्जून नमूद करतात. नृत्याची आवड जोपासण्यासाठी, कलेच्या क्षेत्रात पुढे जाण्यासाठी आणि विविध संधींचा लाभ घेण्यासाठी पतीकडून मिळणारे प्रोत्साहन त्यांच्यासाठी महत्त्वाचे ठरले आहे. एकीकडे संसार आणि दीड वर्षांच्या बाळाची जबाबदारी, तर दुसरीकडे नृत्याची साधना, अशा दोन्ही आघाड्यांवर समतोल साधत शिवानी आपला प्रवास पुढे नेत आहेत. ‘राज्यस्तरीय नवदुर्गा महाराष्ट्र गौरव पुरस्कार’ हा सन्मान त्यांच्या कलाप्रवासातील महत्त्वाचा टप्पा ठरला आहे. त्यांच्या या वाटचालीतून महिलांची जिद्द, कलाप्रेम, आत्मविश्वास आणि कुटुंबाच्या साथीचे महत्त्व अधोरेखित होते. भविष्यातही भरतनाट्यमसह विविध नृत्यशैलींच्या माध्यमातून अधिकाधिक रसिकांपर्यंत पोहोचण्याचा त्यांचा मानस आहे.

शिवानी यांनी भरतनाट्यम या शास्त्रीय नृत्यप्रकारासोबतच वेस्टर्न, फोक, बॉलीवूड आणि हिप-हॉप अशा नृत्याच्या विविध शैलींचेही प्रशिक्षण घेतले आहे. त्यामुळे विविध नृत्यप्रकारांमध्ये स्वतःची कला सादर करण्याचा अनुभव त्यांना मिळाला आहे.

भरतनाट्यमच्या शास्त्रशुद्ध शिक्षणासाठी त्यांनी अरंगेत्रमपूर्वी ‘मध्यमा प्रथम’ स्तरापर्यंतच्या चार परीक्षा दिल्या असून, या चारही परीक्षांमध्ये त्या प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाल्या आहेत. नृत्याच्या तांत्रिक बाबी, ताल, लय, भावमुद्रा आणि सादरीकरणातील बारकावे आत्मसात करण्यासाठी त्या सातत्याने प्रयत्नशील आहेत.

गाणी ऐकतानाही त्यांच्या मनात नृत्याच्या विविध कल्पना आकार घेत असतात. गाण्याचे शब्द ऐकण्यापेक्षा त्या गाण्यावर कोणत्या प्रकारे नृत्य सादर करता येईल, याकडे आपले अधिक लक्ष असते, असे त्या सांगतात. नृत्य ही केवळ कला नसून भावना व्यक्त करण्याचे प्रभावी माध्यम असल्याची जाणीव त्यांच्या कलाप्रवासातून दिसून येते.

सध्या शिवानी यांचे बाळ दीड वर्षांचे असल्याने त्यांना प्रत्यक्ष नृत्यवर्गांना नियमित उपस्थित राहणे शक्य होत नाही. मात्र, त्यांनी नृत्यसाधना थांबवलेली नाही. त्या सध्या गुरु ओजस्वी पोल यांच्या मार्गदर्शनाखाली ऑनलाइन भरतनाट्यमचे पुढील प्रशिक्षण घेत आहेत. मातृत्वाची जबाबदारी सांभाळत स्वतःमधील कलाकार जिवंत ठेवण्याचा त्यांचा प्रयत्न सुरू आहे.

## ‘ग्रेटेस्ट ऑफ टुडे’ मोहिमेसाठी तमन्ना आणि लक्ष्यसोबत ‘स्पार्क्स’ची भागीदारी

**पुणे (दै. आरंभ पर्व)**




सतत नवनिर्मिती, प्रयोग आणि स्वतःची अभिव्यक्ती यांना महत्त्व देणाऱ्या आजच्या तरुण पिढीसाठी ‘परिपूर्ण क्षणा’ची वाट पाहणे आता मागे पडत आहे. या बदलत्या जीवनशैलीशी जोडण्यासाठी भारतातील लोकप्रिय फुटवेअर ब्रँड ‘स्पार्क्स’ने ‘ग्रेटेस्ट ऑफ टुडे’ ही नवी ब्रँड मोहीम सुरू केली आहे. या मोहिमेत अभिनेत्री तमन्ना आणि अभिनेता लक्ष्य ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून सहभागी झाले आहेत. या मोहिमेच्या केंद्रस्थानी स्पार्क्सच्या नव्या स्नीकर्स आणि बहुपयोगी स्पोर्ट्स शूजची श्रेणी आहे. तरुण ग्राहकांच्या सक्रिय आणि गतिमान जीवनशैलीला पूरक ठरतील, अशा पद्धतीने ही उत्पादने तयार करण्यात आली आहेत. ‘बीबीडीओ ग्रुप इंडिया’चा भाग असलेल्या ‘मुद्रा’ संस्थेने या मोहिमेची संकल्पना मांडली आहे. ‘ग्रेटेस्ट ऑफ ऑल टाइम’ अर्थात ‘GOAT’ या लोकप्रिय संज्ञेपासून प्रेरणा घेत, त्याचे ‘ग्रेटेस्ट ऑफ टुडे’ असे नवे रूप या मोहिमेत मांडण्यात आले आहे.

## नवीन एक्सपिरियन्स सेंटर्सद्वारे ॲंपिअरचा पुण्यात किरकोळ विक्रीचा विस्तार

- **विक्री आणि सेवा सहाय्यासह 'भारत की स्मार्ट राइड' (Bharat Ki Smart Ride) पोर्टफोलिओ ॲम्पिअर या क्षेत्रातील ग्राहकांच्या अधिक जवळ आणते आहे**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

मौली गार्डन आणि विश्रांतवाडी येथे अनुक्रमे आनंदी ॲम्पीअर आणि एस कुडाळे कॉर्पोरेशन लिमिटेडचे उद्घाटन करून पुण्यातील आपली रिटेल आणि सेवा उपस्थिती ॲम्पीअरने आज अधिक मजबूत केली आहे.



ही नवीन ॲम्पीअर एक्सपीरियन्स सेंटर्स ग्राहकांना एकाच छताखाली विक्री आणि सेवेचा सर्वसमावेशक अनुभव देतील, ज्यामुळे या भागातील ग्राहकांसाठी इलेक्ट्रिक मोबिलिटी अधिक सुलभ आणि सोयीस्कर होईल.

या नवीन एक्सपीरियन्स सेंटर्समध्ये ॲम्पीअरच्या इलेक्ट्रिक स्कूटर पोर्टफोलिओचे प्रदर्शन केले जाईल, जो विविध प्रकारच्या मोबिलिटी गरजा आणि ग्राहक वर्गांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी तयार करण्यात आल्या आहेत. या पोर्टफोलिओच्या केंद्रस्थानी 'ॲम्पीअर नेक्सस EX+' आहे, ज्यात नवीन 5 किलोवॅट क्षमतेची शक्तिशाली मोटर असून, भारतातील काही अत्यंत आव्हानात्मक भूप्रदेशांमधील तिची कामगिरी सिद्ध करणारे अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय विक्रम तिच्या नावावर आहेत.

कुटुंबांसाठी आणि किमतीची काळजी असणाऱ्या ग्राहकांसाठी, मॅग्नस जीमॅक्स दैनंदिन उपयुक्तता, कनेक्टेड तंत्रज्ञान आणि परवडणारी किंमत यांचा मेळ घालते, तर मॅग्नस निओची रचना एर्गोनॉमिक्स आणि शहरातील दैनंदिन आरामदायक प्रवासावर लक्ष केंद्रित करून करण्यात आली आहे. नुकतीच लॉन्च झालेली ॲम्पीअर रिओ व्हायब, विद्यार्थी आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसह तरुण रायडर्ससाठी पोर्टफोलिओचा विस्तार करते.

# जलसुरक्षेसाठी पाण्याचे योग्य नियोजन, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर गरजेचा

### केंद्रीय जलशक्ती राज्यमंत्री डॉ. राज भूषण चौधरी यांचे प्रतिपादन; आर्यन्स ग्रुप आयोजित तंत्रज्ञान व नवकल्पना राष्ट्रीय परिषदेचा समारोप

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

"देशाच्या विकासासाठी तंत्रज्ञान, नवकल्पना आणि लोकसहभाग यांची सांगड घालणे आवश्यक आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गेल्या काही वर्षांत आत्मनिर्भर भारताच्या संकल्पनेवर भर दिला असून, त्यादृष्टीने स्वदेशी उद्योग आणि व्यवसायांना सरकारकडून प्रोत्साहन दिले जात आहे. स्टार्टअप इंडिया, स्टँडअप इंडिया, मेक इन इंडिया यामधून मोदीजींनी स्वदेशी उद्योग आणि स्थानिक उत्पादनांना चालना दिली आहे. देशातील युवापिढीने नवतंत्रज्ञान, कौशल्ये आत्मसात करीत नवकल्पना साकारत विकासप्रक्रियेत सक्रिय सहभाग घ्यावा," असे प्रतिपादन केंद्रीय जलशक्ती राज्यमंत्री डॉ. राज भूषण चौधरी यांनी केले.




आर्यन्स ग्रुप ऑफ कंपनीजच्या वतीने आयोजित ‘एडब्ल्यूटीआयएस २०२६’, या तंत्रज्ञान व नवकल्पनाविषयक तीन दिवसीय राष्ट्रीय परिषदेच्या समारोपावेळी डॉ. राज भूषण चौधरी बोलत होते. हिंजवडीतील हॉटेल विवांता येथे आयोजित या कार्यक्रमावेळी आर्यन्स ग्रुपचे अध्यक्ष मुकुंद जगताप, मुख्य कार्यकारी अधिकारी मनोहर जगताप, सहकार्यकारी अध्यक्ष स्मिता शितोळे-जगताप, 'इस्त्रो'चे संचालक डॉ. एस. व्यंकटेश्वरा शर्मा, डिफेन्स प्रोग्राम तज्ज्ञ महेश शेळके, सायबर सिक्युरिटी तज्ज्ञ मिलिंद पटनायक, 'आर्यन्स ग्रुप'चे संचालक अजय जगताप, सागर कानडे आदी उपस्थित होते.

डॉ. राज भूषण चौधरी म्हणाले, "कृत्रिम बुद्धिमत्ता, इंटरनेट ऑफ थिंग्ज आणि आधुनिक डिजिटल तंत्रज्ञानाच्या प्रभावी वापरातून भारत आत्मनिर्भरतेच्या दिशेने वाटचाल करीत आहे. अंतराळ तंत्रज्ञान, हरित ऊर्जा आणि जलव्यवस्थापन क्षेत्रातील नवकल्पना देशाच्या विकासाला नवी दिशा देणाऱ्या ठरतील. तसेच हायड्रोजन ऊर्जेचा वापर वाढवून पारंपरिक इंधनावरील अवलंबित्व कमी करणे आणि पर्यावरणपूरक विकास साधणे आवश्यक आहे. आर्यन्स ग्रुपकडून अंतराळ तंत्रज्ञान, हरित ऊर्जा आणि डिजिटल क्षेत्रात सुरू असलेले काम महत्त्वपूर्ण आहे. अशा परिषदांमुळे नवउद्योजक आणि तरुणांना नवनवीन संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी प्रेरणा मिळते. ‘आत्मनिर्भर भारत’ आणि ‘मेक इन इंडिया’ या संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढविणे गरजेचे आहे."

डॉ. एस. व्यंकटेश्वरा शर्मा यांनी 'इस्त्रो'च्या विविध अवकाश मोहिमांविषयी माहिती दिली. डॉ. शर्मा म्हणाले की, अंतराळाचा सुरक्षित आणि शाश्वत वापर सुनिश्चित करण्यासाठी जागतिक सहकार्य, अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि प्रभावी कचरा व्यवस्थापन ही काळाची गरज आहे. अंतराळातील निकामी उपग्रह आणि रॉकेटचे अवशेष ही भविष्यातील अंतराळ मोहिमांसमोरील गंभीर समस्या आहे. या कचऱ्यामुळे कार्यरत उपग्रहांना धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे निकामी उपग्रहांना पृथ्वीच्या वातावरणात आणून नष्ट करणे किंवा सुरक्षित कक्षेत हलविणे आवश्यक आहे. नासा, इस्रो, युरोपियन स्पेस एजन्सी आणि जपानची अंतराळ संस्था यांसह जगभरातील संस्था या समस्येवर उपाय शोधत आहेत, असेही त्यांनी नमूद केले.

समारोपीय भाषणात मनोहर जगताप यांनी सांगितले की, "या तीन दिवसीय परिषदेत तंत्रज्ञान, संशोधन, नवकल्पना, संरक्षण क्षेत्रातील तंत्रज्ञान आणि सायबर सुरक्षेसारख्या विषयांवर विचारमंथन झाले.

## ग्रामपंचायत कुसेगाव, ता. दौंड, जि. पुणे

**बी-१ पेपर नोटीस क्रमांक-१ सन २०२५-२६**

ग्रामपंचायत कुसेगाव, ता. दौंड, जि.पुणे यांचेकडून खालील नमूद केलेल्या कामांची निविदा बी १ निविदापद्धतीने (दोन सिलबंद लिफाफा पद्धतीने) जिल्हा परिषद कडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत ठेकेदारांकडून मागवण्यात येत आहेत. कोऱ्या निविदेचा नमुना ग्रामपंचायत कुसेगाव, ता. दौंड, जि. पुणे यांच्याकडून दिनांक ११.१०.२०२६ ते दिनांक १७.१०.२०२६ या कालावधीत कामकाजाच्या दिवशी सकाळी १० ते सायंकाळी ०६ वाजेपर्यंत देण्यात येतील व दिनांक ११.१०.२०२६ ते दिनांक १७.१०.२०२६ सकाळी १० ते सायंकाळी ०६ वाजेपर्यंत पोस्टाने / समक्ष ग्रामपं-चायत मध्ये स्विकारले जातील. सदर सिलबंद निविदा मासिक सभे दिवशी/ग्रामपंचायत सोईनसार उघडण्यात येतील.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | निविदा विक्री करण्याचा कालावधी | निविदा फी | इसारा रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | मौजे कुसेगाव (गावठाण व वाड्या-वस्त्या) येथे अंतर्गत गटर करणे. | १,९९,८९१/- | १४.१०.२०२६ ते १९.१०.२०२६ | २३६/- | १,९९८/- |
| २ | जॅकवेल येथील मोटर आणि पाणीपुरवठा पाईपलाईन दुरुस्त करणे. | १,८०,०००/- | | २३६/- | १,८००/- |

१) कोणतीही निविदा स्विकारणे अथवा नाकारणेचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे. २) कोऱ्या निविदा फीग्रामपंचायत कुसेगाव खाते क्र. ०४८००२५०००००१०६ (PDCC बँक शाखा पाटस) वर किंवा ग्रा.प. कार्यालयात रोख भरल्यानंतर उपलब्ध होतील. तसेच निविदा भरणे कमी आवश्यक अटी व शर्ती सोबत दिल्या जातील. ३) यापूर्वी केलेल्या कामांचे पूर्णत्वाचे दाखले जोडावेत. ४) इसारा रक्कम ग्रामपंचायत कुसेगाव ग्रामनिधी खाते ०४८००२५०००००१०६ (PDCC बँक शाखा पाटस) खाते क्र. च्या खाती भरल्याची पावती जोडण्यात यावी किंवा ग्रामपंचायत नवे धनादेश/डी.डी. जोडण्यात यावा. तसे न केल्यास आपल्या निविदेचा विचार केला जाणार नाही. ५) आपण तांत्रिक लिफाफा व आर्थिक लिफाफा वेगवेगळा सादर करणे आवश्यक आहे. तांत्रिक लिफाफा प्रथम उघ-डण्यात येईल आपण सर्व नियमास पात्र झाल्यानंतर आधिक लिफाफा उघडण्यात येईल. सदर निविदा बाबत कोणताही वाद उत्पन्न झाल्यास निविदा रद्द करणेचा, कोणतीही निविदा स्वीकारणेचा अथवा नाकारणेचा सर्व अधिकार ग्रामपंचायत कुसेगाव यांनी राखून ठेवला आहे.

सही/-
ग्रामसेवक
ग्रामपंचायत कुसेगाव, ता. दौंड, जि. पुणे.

सही/-
सरपंच
ग्रामपंचायत कुसेगाव, ता. दौंड, जि. पुणे.

## थोडक्यात पण महत्वाचे



## मुख्यमंत्री यांच्या हस्ते ह्युंडाई मोटर इंडिया'च्या पुणे प्लांटचे उद्घाटन

पुणे (आरंभ पर्व) : ह्युंडाई मोटर इंडिया लिमिटेडने (एचएमआयएल) आज महाराष्ट्रातील तळेगाव, पुणे येथील आपल्या अत्याधुनिक उत्पादन प्लांटच्या औपचारिक उद्घाटनाची घोषणा केली, जो भारतातील कंपनीच्या वाढीच्या प्रवासातील महत्त्वपूर्ण टप्पा ठरला आहे. या प्लांटचे उद्घाटन महाराष्ट्राचे माननीय मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. या उद्घाटनप्रसंगी भारतासाठी कोरिया प्रजासत्ताकाचे राजदूत महामहीम ली सेओंग-हो; महाराष्ट्राच्या माननीय उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्रा अजित पवार; ह्युंडाई मोटर ग्रुपचे (एचएमजी) एक्झिक्युटिव्ह चेअर श्री. युसन चंग, एचएमजीचे व्हाईस चेअर श्री. जेहून चांग, ह्युंडाई मोटर कंपनीचे (एचएमसी) प्रेसिडंट व सीईओ श्री. होजे मुनोज आणि एचएमआयएलचे मॅनेजिंग डायरेक्टर व सीईओ श्री. तरुण गर्ग उपस्थित होते. या विशेष प्रसंगी, एचएमआयएलने 1999 पासून भारतातून 4 दशलक्ष प्रवासी वाहनांच्या एकत्रित निर्यातीची ऐतिहासिक कामगिरी देखील साजरी केली, याद्वारे भारताला जागतिक ऑटोमोटिव्ह उत्पादन आणि निर्यात केंद्र म्हणून प्रस्थापित करण्यातील कंपनीचे योगदान अधोरेखित केले. एकत्रितपणे, एचएमआयएल प्रवासी वाहनांची सर्वात मोठी निर्यातदार आणि भारतातून 4 दशलक्ष निर्यातीचा टप्पा गाठणारी पहिली ऑटोमोबाईल उत्पादक कंपनी ठरली आहे. कंपनीने देशांतर्गत बाजारपेठेत जवळपास 10 दशलक्ष प्रवासी वाहनांची विक्री केली आहे, ज्यामधून भारतीय ग्राहकांमधील कंपनीची प्रबळ आणि निरंतर उपस्थिती दिसून येते.

## निवेदक असोसिएशनच्या कायदेशीर सल्लागारपदी ॲड. संदीप देशमुख



राजगुरूनगर (आरंभ पर्व) : राजगुरूनगर येथील खेड तालुका निवेदक असोसिएशनच्या कायदेशीर सल्लागारपदी सुप्रसिद्ध निवेदक ॲड. संदीप देशमुख यांची निवड करण्यात आली. खेड तालुका निवेदक असोसिएशन या संस्थेची स्थापना करण्यात आली असून, अध्यक्ष आदेश टोपे व कार्याध्यक्ष सुदाम कराळे यांनी ॲड. संदीप देशमुख यांना निवडीचे पत्र दिले. प्रसिद्ध व्याख्याते गणेश शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत ॲड. संदीप देशमुख यांचा सत्कार व स्नेहमेळावा येथे उत्साहात संपन्न झाला.

## अंशुल सिंघल यांचा ₹४,२०० कोटींचा रिअल इस्टेट विकास मंच सुरू



मुंबई (आरंभ पर्व) : रिअल इस्टेट क्षेत्रातील संस्थात्मक मंच उभारण्याचा दोन दशकांहून अधिक अनुभव असलेले ज्येष्ठ व्यावसायिक अंशुल सिंघल यांनी 'व्हॅन्ट्रॉक रिअल ॲसेट्स प्रायव्हेट लिमिटेड' (VRAPL) या नव्या रिअल ॲसेट्स मंचाची सुरुवात केली आहे. गोदामे, औद्योगिक पार्क आणि मालवाहतूक व्यवस्थेशी संबंधित पायाभूत सुविधांच्या विकासावर कंपनीचा प्रारंभीचा भर राहणार आहे. या माध्यमातून सुमारे १.१५ कोटी चौरस फूट क्षेत्र विकसित करण्याची योजना असून, या प्रकल्पांचे एकूण विकासमूल्य सुमारे ४,२०० कोटी रुपये असल्याचे कंपनीने जाहीर केले आहे. मुंबईत मुख्यालय असलेल्या या कंपनीच्या विकास योजनेतील पहिल्या टप्प्यात सुमारे ३० लाख चौरस फूट क्षेत्राचा समावेश आहे. या प्रकल्पांचे विकासमूल्य अंदाजे १,१०० कोटी रुपये असून, ते दिल्ली-राष्ट्रीय राजधानी क्षेत्र, बंगळुरू आणि पुणे येथे उभारण्यात येणार आहेत. या प्रकल्पांचे बांधकाम २०२७ मध्ये सुरू करण्याचे आणि २०२८ पासून भाडे उत्पन्न मिळविण्याचे कंपनीचे उद्दिष्ट आहे. संबंधित प्रकल्पांसाठी जमिनीच्या वाटाघाटी, कागदपत्रांची पूर्तता आणि नियामक मंजुरीची प्रक्रिया विविध टप्प्यांवर असल्याचे कंपनीने स्पष्ट केले आहे.

## गणेश आचार्य यांच्या 'गणेश डस्ट टू स्टारडस्ट'चा दमदार ट्रेलर प्रदर्शित!

पुणे (आरंभ पर्व) : स्वप्नं पाहण्याचे धाडस, ती पूर्ण करण्यासाठी घेतलेली मेहनत आणि प्रतिकूल परिस्थितीवर मात करण्याची जिद्द यांचा प्रेरणादायी प्रवास आता मोठ्या पडद्यावर पाहायला मिळणार आहे. प्रसिद्ध नृत्यदिग्दर्शक आणि चित्रपट दिग्दर्शक गणेश आचार्य यांच्या आगामी 'गणेश डस्ट टू स्टारडस्ट' या चित्रपटाचा बहुप्रतीक्षित ट्रेलर प्रदर्शित झाला आहे. भावना, संघर्ष, नृत्य आणि मनोरंजनाची सांगड घालणारा हा चित्रपट ११ डिसेंबर २०२६ रोजी चित्रपटगृहांत प्रदर्शित होणार आहे. चित्रपटाची घोषणा आणि पहिले पोस्टर प्रदर्शित झाल्यानंतर ट्रेलरमधून प्रेक्षकांना एका वेगळ्या भावविश्वाची झलक पाहायला मिळत आहे. परिस्थिती कितीही प्रतिकूल असली, तरी स्वप्नांवर विश्वास ठेवून पुढे जाणाऱ्या व्यक्तींचा संघर्ष या चित्रपटाच्या केंद्रस्थानी आहे. महत्त्वाकांक्षा, कौटुंबिक जबाबदाऱ्या, त्याग आणि यशासाठी करावी लागणारी धडपड यांचे प्रभावी चित्रण ट्रेलरमध्ये करण्यात आले आहे.

## घटस्थापनेच्या दिवशी स्पिनीने केल्या १,३७० कारच्या डिलिव्हरी

पुणे (आरंभ पर्व) : नवरात्रोत्सवाच्या पहिल्या दिवशी, म्हणजेच घटस्थापनेला, स्पिनी या वापरलेल्या कारच्या ऑनलाइन व्यासपीठाने देशातील २४ शहरांमध्ये १,३७० कारची डिलिव्हरी करून एका दिवसातील सर्वाधिक डिलिव्हरीचा विक्रम नोंदवला. मागील विक्रमाच्या तुलनेत डिलिव्हरीमध्ये १.७ पट वाढ झाली असून, गेल्या वर्षीच्या नवरात्रीच्या पहिल्या दिवसाच्या तुलनेत यंदा ९६ टक्के वाढ झाली.११ ऑक्टोबर रोजी दर ४१ सेकंदांनी एका कारचे ग्राहकांना हस्तांतरण करण्यात आले. दुपारी १२ ते १ या वेळेत सर्वाधिक ११२ कार वितरित करण्यात आल्या. शहरनिहाय आकडेवारीत पुणे १८० कारच्या डिलिव्हरीसह आघाडीवर राहिले. दिल्ली-एनसीआर, महाराष्ट्र आणि कर्नाटक यांचा एकूण डिलिव्हरीमध्ये ६२ टक्के वाटा होता. मारुती सुझुकी बलेनो सर्वाधिक वितरित झालेली कार ठरली. त्यानंतर ग्रँड i10, क्विड, स्विफ्ट आणि टियागोला पसंती मिळाली.

# 'नवदुर्गा - माझ्यातली शक्ती' कार्यशाळेला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद!

## हसत-खेळत उपक्रम, भावनिक संवाद अन् पारंपरिक भोंडल्याने रंगला महिलांचा मेळावा



**उरुळी कांचन (दै. आरंभ पर्व)**

महिलांना स्वतःमधील सामर्थ्याची जाणीव करून देतानाच दैनंदिन जीवनातील ताणतणाव विसरून आनंदाचे क्षण अनुभवता यावेत, या उद्देशाने आयोजित करण्यात आलेली 'नवदुर्गा - माझ्यातली शक्ती' ही महिला कार्यशाळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. तथास्तु कन्सल्टन्सी आणि कस्तुरबा मातृ मंडळ, उरुळी कांचन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या कार्यशाळेला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. मनोरंजक खेळ, भावनिक संवाद आणि पारंपरिक भोंडल्याच्या माध्यमातून महिलांनी आनंदाचे क्षण अनुभवले.

दीड तास चाललेल्या या कार्यशाळेत ॲड. अश्विनी सचिन जगताप यांनी आपल्या उत्स्फूर्त, संवादात्मक आणि खेळकर शैलीत महिलांशी संवाद साधला. विविध कृतीशील उपक्रम आणि मनोरंजक खेळांच्या माध्यमातून त्यांनी महिलांना स्वतःच्या भावना समजून घेणे, मनावरील ताण हलका करणे, स्वतःकडे सकारात्मक दृष्टिकोनातून पाहणे आणि स्वतःच्या आनंदासाठी वेळ देणे यांचे महत्त्व पटवून दिले. त्यांच्या सहजसुंदर संवादशैलीमुळे महिला कार्यशाळेत मनापासून सहभागी झाल्या. सुरुवातीला मनात अनेक प्रश्न, शंका आणि ताणतणाव घेऊन आलेल्या महिला कार्यशाळेच्या अखेरीस समाधान, आनंद आणि सकारात्मक ऊर्जा घेऊन परतल्या.

कार्यशाळेबाबत मनोगत व्यक्त करताना ॲड. अश्विनी सचिन जगताप म्हणाल्या, "आजच्या कार्यशाळेचा किमान एका महिलेला जरी उपयोग झाला, तिच्या मनावरील ताण कमी झाला किंवा तिला स्वतःकडे नव्या दृष्टिकोनातून पाहण्याची प्रेरणा मिळाली, तरी आजच्या कार्यशाळेचे सार्थक झाले, असे मी समजेन."

त्यांच्या या भावनिक मनोगताने कार्यशाळेच्या मुख्य उद्देशाचे महत्त्व अधोरेखित झाले. महिलांनीही या उपक्रमाबद्दल समाधान व्यक्त करत अशा कार्यशाळांचे वारंवार आयोजन करण्याची अपेक्षा व्यक्त केली.

कार्यशाळेनंतर आयोजित पारंपरिक भोंडल्याने कार्यक्रमात विशेष रंगत आणली. महिलांनी भोंडल्याची गाणी म्हणत, जुन्या आठवणींना उजाळा देत आणि एकमेकींसोबत आनंदाचे क्षण अनुभवत उत्स्फूर्त सहभाग घेतला. भोंडल्याच्या खेळानंतर खिरापतीचाही आस्वाद घेण्यात आला. 'कित्येक वर्षांनी आज भोंडला खेळायला मिळाला,' अशा भावना अनेक महिलांनी व्यक्त केल्या. विस्मृतीत गेलेल्या या पारंपरिक खेळाच्या निमित्ताने महिलांना बालपणीच्या आठवणी पुन्हा जगण्याची संधी मिळाली.

आजच्या धावपळीच्या जीवनात घर, कुटुंब आणि कामाच्या जबाबदाऱ्या सांभाळताना महिलांना अनेकदा स्वतःसाठी वेळ देता येत नाही. अशा परिस्थितीत या कार्यशाळेने महिलांना दैनंदिन व्यापातून काही काळ बाहेर पडून स्वतःकडे लक्ष देण्याची आणि मैत्रिणींसोबत आनंदाचे क्षण अनुभवण्याची संधी उपलब्ध करून दिली. मानसिक स्वास्थ्य, आत्मभान, सकारात्मक विचार आणि पारंपरिक संस्कृतीचे जतन यांचा सुंदर संगम या उपक्रमात पाहायला मिळाला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आशा कांचन यांनी केले, तर कस्तुरबा मातृ मंडळाच्या अध्यक्षा सौ. सुरेखा देविदास भन्साळी यांनी आभार मानले. या वेळी विविध क्षेत्रांतील मान्यवर महिला उपस्थित होत्या. 'नवदुर्गा - माझ्यातली शक्ती' या उपक्रमाने महिलांना स्वतःमधील सामर्थ्य ओळखण्याची, स्वतःच्या आनंदाला महत्त्व देण्याची आणि आयुष्याकडे सकारात्मकतेने पाहण्याची प्रेरणा दिली. नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर स्त्रीशक्तीचा जागर केवळ पूजेतून नव्हे, तर महिलांच्या भावविश्वाचा सन्मान करून आणि त्यांना स्वतःसाठी जगण्याची संधी देऊनही करता येतो, हा संदेश या कार्यशाळेने दिला.

## विवोचे 'ओरिजिनओएस ७' भारतात सादर




- कृत्रिम बुद्धिमत्तेच्या मदतीने स्मार्टफोन वापर अधिक स्मार्ट होणार

**नवी दिल्ली (दै. आरंभ पर्व)**

विवो इंडियाने 'ओरिजिनओएस ७' ही नवीन कार्यप्रणाली सादर केली आहे. स्मार्टफोनचा वापर अधिक सुलभ, वेगवान आणि कार्यक्षम करण्याच्या उद्देशाने विकसित करण्यात आलेल्या या कार्यप्रणालीमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित विविध सुविधा, एकाच वेळी अनेक कामे करण्याची क्षमता, उपकरणांमधील सहज जोडणी, वैयक्तिकृत रचना आणि सुधारित सुरक्षा यांचा समावेश आहे. 'सोपे, स्मार्ट आणि जोडलेले' या तीन प्रमुख संकल्पनांवर आधारित ही कार्यप्रणाली वापरकर्त्यांचा दैनंदिन स्मार्टफोन अनुभव अधिक समृद्ध करण्यावर भर देते. ओरिजिनओएस ७ मध्ये 'ओरिजिन स्मूथ इंजिन', 'फ्लुइड मोशन' आणि 'स्प्रिंग ॲनिमेशन' या तंत्रज्ञानांचा वापर करण्यात आला आहे. त्यामुळे विविध अनुप्रयोग सुरू करताना, त्यांच्यामध्ये बदल करताना आणि पडद्यावर माहिती वर-खाली सरकवताना अधिक सहज अनुभव मिळण्यास मदत होते. कंपनीच्या माहितीनुसार, फ्लुइड मोशन तंत्रज्ञान २०० हून अधिक परिस्थितींमध्ये गतिशील प्रतिसाद देते. स्प्रिंग ॲनिमेशनमुळे वापरकर्त्यांच्या स्पर्शानुसार पडद्यावरील हालचाली अधिक नैसर्गिक भासतात. दीर्घकाळ वापर केल्यानंतरही कार्यप्रणालीची गती आणि प्रतिसादक्षमता टिकवून ठेवण्यासाठी स्मृती व्यवस्थापन आणि प्रणालीच्या कार्यक्षमतेत सुधारणा करण्यात आल्या आहेत. आव्हानात्मक परिस्थितीत महत्त्वाच्या कामांना प्राधान्य देण्यासाठी 'स्नॅप-अप इंजिन' आणि नेटवर्कची गती व स्थिरता सुधारण्याच्या उद्देशाने अद्ययावत सिग्नल प्रणालीचाही वापर करण्यात आला आहे. या कार्यप्रणालीतील महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे 'जोवी' हा विवोचा कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित सहाय्यक. माहिती शोधणे, फाइलमधील मजकूर ओळखणे, नियोजित कामांमध्ये मदत करणे आणि विविध कामे पूर्ण करण्यासाठी आवश्यक सूचना देणे, अशा सुविधा त्याद्वारे उपलब्ध होतात.

## नऱ्हे पोलीस ठाण्यासमोर ड्रेनेजचे पाणी रस्त्यावर

- महापालिका प्रशासनाचे दुर्लक्ष!
- नऱ्हे परिसरातील इतर ठिकाणीही ड्रेनेजचे पाणी रस्त्यावर
- नागरिकांसह पोलीसांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर



**नऱ्हे, पुणे (दै. आरंभ पर्व)**

नऱ्हे पोलीस ठाण्यासमोर गेल्या पंधरा दिवसांपासून ड्रेनेजचे सांडपाणी रस्त्यावर वाहत असून, पुणे महानगरपालिका प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. याशिवाय नऱ्हे परिसरातील इतर ठिकाणीही सकाळच्या वेळी ड्रेनेजचे पाणी रस्त्यावर वाहत असल्याने नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे.

ड्रेनेजचे सांडपाणी रस्त्यावर वाहत असल्याने परिसरात अस्वच्छता निर्माण होत असून, दुर्गंधीचा त्रास नागरिकांना सहन करावा लागत आहे. सांडपाण्यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता असून, वाहनचालक आणि पादचाऱ्यांनाही या परिस्थितीचा सामना करावा लागत आहे.

विशेष म्हणजे, नऱ्हे पोलीस ठाण्यासमोरील ड्रेनेजची समस्या गेल्या पंधरा दिवसांपासून कायम आहे. त्यातच परिसरातील इतर ठिकाणीही ड्रेनेजचे पाणी रस्त्यावर येत असल्याने संबंधित विभागाच्या कामकाजाबाबत नाराजी व्यक्त केली जात आहे.

### प्रज्ञा पोतदार यांच्याकडून विभागाला सूचना

या समस्येची दखल घेत सिंहगड रोड क्षेत्रीय सहाय्यक आयुक्त प्रज्ञा पोतदार यांनी संबंधित विभागाला आवश्यक त्या सूचना दिल्या आहेत. तसेच या समस्येवर लवकरात लवकर कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासन दिले आहे. त्यामुळे आता संबंधित विभागाकडून प्रत्यक्षात किती लवकर कार्यवाही होते, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

नऱ्हे पोलीस स्टेशन व परिसरातील ड्रेनेजची समस्या तातडीने सोडवून रस्त्यावर वाहणाऱ्या सांडपाण्याची साफसफाई करावी. तसेच ड्रेनेज तुंबण्याची कारणे शोधून योग्य ती दुरुस्ती करावी. अशी मागणी भाजप प्रभाग अध्यक्ष राजुदादा कुटे यांनी केली आहे. त्यामुळे प्रशासनाने या समस्येची गांभीर्याने दखल घेऊन तातडीने कार्यवाही करावी आणि नऱ्हेकरांना दिलासा द्यावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# 'आरंभ पर्व राज्यस्तरीय नवदुर्गा पुरस्कार २०२६' साठी नामांकन करा!

## नवरात्रोत्सवानिमित्त समाजातील प्रेरणादायी महिला दुर्गांचा होणार सन्मान; १८ ऑक्टोबरला पुण्यात पुरस्कार सोहळा

पुनर्निर्मितीतून प्रगतीकडे...!
पुणे प्रहार
www.puneprahar.com
यांच्या सहयोगाने

यशस्विनी विकास प्रतिष्ठान
यशस्वी, स्वच्छंदी, भरारी
यांच्या सहकार्यातून

दैनिक आरंभपर्व
MAHMAR/2023/89313
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com




महिलांच्या कर्तृत्वाचा सन्मान, त्यांच्या संघर्षाला सलाम आणि त्यांच्या यशाला नवी ओळख देणारा 'आरंभ पर्व राज्यस्तरीय नवदुर्गा पुरस्कार २०२६' हा उपक्रम ठरणार असून, या निमित्ताने समाजातील अनेक प्रेरणादायी महिला दुर्गांच्या कार्याचा गौरव होण्याची अपेक्षा आहे.

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे, प्रतिनिधी : समाजातील विविध क्षेत्रांत आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविणाऱ्या, प्रतिकूल परिस्थितीवर मात करून यश संपादन करणाऱ्या आणि आपल्या कार्यातून इतर महिलांना प्रेरणा देणाऱ्या कर्तृत्ववान महिलांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी 'आरंभ पर्व राज्यस्तरीय नवदुर्गा पुरस्कार २०२६' या विशेष पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. नवरात्रोत्सवाचे औचित्य साधून आयोजित करण्यात येणाऱ्या या उपक्रमासाठी पात्र आणि कर्तृत्ववान महिलांनी मोठ्या संख्येने नामांकने सादर करावीत, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

यशस्विनी विकास प्रतिष्ठान, पुणे आणि पुणे प्रहार यांच्या संयुक्त विद्यमाने, दैनिक आरंभ पर्व, पुण्याच्या वतीने या पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. महिलांच्या कर्तृत्वाला व्यासपीठ उपलब्ध करून देणे, त्यांच्या कार्याची समाजाला ओळख करून देणे आणि नव्या पिढीसमोर प्रेरणादायी आदर्श निर्माण करणे, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश आहे.

सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, कला, क्रीडा, उद्योग, व्यवसाय, आरोग्य, महिला सक्षमीकरण, उद्योजकता तसेच अन्य विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांना या पुरस्काराच्या माध्यमातून सन्मानित करण्यात येणार आहे. स्वतःच्या जिद्द, चिकाटी, मेहनत आणि सामाजिक बांधिलकीच्या बळावर वेगळी ओळख निर्माण करणाऱ्या महिलांच्या कार्याचा गौरव करण्याचा आयोजकांचा प्रयत्न आहे.

महिलांचे यश केवळ त्यांच्या वैयक्तिक प्रगतीपुरते मर्यादित नसून, त्यातून कुटुंब, समाज आणि पुढील पिढीला नवी दिशा मिळते. अशा महिलांच्या संघर्षाची, यशाची आणि समाजासाठी केलेल्या योगदानाची दखल घेत त्यांना सन्मानित करण्यासाठी हा पुरस्कार सोहळा महत्त्वपूर्ण ठरणार आहे. त्यामुळे विविध क्षेत्रांत कार्यरत असलेल्या महिलांनी स्वतःहून किंवा संबंधितांच्या माध्यमातून नामांकनासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

मान्यवरांची उपस्थिती; अभिनेत्रींचे विशेष आकर्षण

'आरंभ पर्व राज्यस्तरीय नवदुर्गा पुरस्कार २०२६' हा सोहळा रविवार, १८ ऑक्टोबर २०२६ रोजी सायंकाळी ४ ते ८ या वेळेत सिल्व्हर पेटल्स हॉल, लाडली साडी सेंटरजवळ, धायरी फाटा, सिंहगड रस्ता, पुणे येथे आयोजित करण्यात आला आहे.

या कार्यक्रमाला पुण्याच्या महापौर सौ. मंजुषाताई नागपुरे, सामाजिक कार्यकर्त्या सौ. तृप्तीताई देसाई आणि यशस्विनी विकास प्रतिष्ठानच्या संस्थापिका सौ. सुनिता डांगे यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. तसेच अभिनेत्री मोनालीसा बागल आणि अभिनेत्री, मॉडेल व निवेदिका मयुरी नव्हाते यांची उपस्थिती हे या सोहळ्याचे विशेष आकर्षण असणार आहे.

आपल्या कर्तृत्वाची ओळख समाजापर्यंत पोहोचवा!

आपल्या कार्यातून समाजात सकारात्मक बदल घडविणाऱ्या आणि इतरांसाठी प्रेरणादायी ठरणाऱ्या महिलांनी या पुरस्कारासाठी नामांकन करण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे. अधिक माहिती आणि नामांकन प्रक्रियेबाबत मार्गदर्शन मिळविण्यासाठी ७२७६३१४१४२ / ८६०५२८४२७२ या क्रमांकांवर संपर्क साधावा.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.


दैनिक
आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
DESIGN CONCEPT BY :
SUNSHINE GRAPHICS
DESIGN_8379928399
राज्यस्तरीय
नवदुर्गा पुरस्कार २०२६
पुणे प्रहार
प्रमुख उपस्थिती
सौ.तृप्तीताई देसाई
(सामाजिक कार्यकर्त्या)
स्थळ : सिल्व्हर पेटल्स हॉल, लाडली साडी सेंटरजवळ,
धायरी फाटा, सिंहगड रोड, पुणे.
रविवार दिनांक 18 ऑक्टोबर 2026 - वेळ : सायंकाळी 4 ते 8
अधिक माहितीसाठी : 7276314142 / 8605284272


दैनिक
आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
DESIGN CONCEPT BY :
SUNSHINE GRAPHICS
DESIGN_8379928399
राज्यस्तरीय
नवदुर्गा पुरस्कार २०२६
पुणे प्रहार
विशेष आकर्षण
मयुरी नव्हाते
(अभिनेत्री, मॉडेल, अँकर)
स्थळ : सिल्व्हर पेटल्स हॉल, लाडली साडी सेंटरजवळ,
धायरी फाटा, सिंहगड रोड, पुणे.
रविवार दिनांक 18 ऑक्टोबर 2026 - वेळ : सायंकाळी 4 ते 8
अधिक माहितीसाठी : 7276314142 / 8605284272


दैनिक
आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
DESIGN CONCEPT BY :
SUNSHINE GRAPHICS
DESIGN_8379928399
राज्यस्तरीय
नवदुर्गा पुरस्कार २०२६
पुणे प्रहार
प्रमुख उपस्थिती
सौ.सुनिता डांगे
(संस्थापिका यशस्विनी विकास प्रतिष्ठान)
स्थळ : सिल्व्हर पेटल्स हॉल, लाडली साडी सेंटरजवळ,
धायरी फाटा, सिंहगड रोड, पुणे.
रविवार दिनांक 18 ऑक्टोबर 2026 - वेळ : सायंकाळी 4 ते 8
अधिक माहितीसाठी : 7276314142 / 8605284272


दैनिक
आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
DESIGN CONCEPT BY :
SUNSHINE GRAPHICS
DESIGN_8379928399
राज्यस्तरीय
नवदुर्गा पुरस्कार २०२६
पुणे प्रहार
विशेष आकर्षण
मोनालीसा बागल
(अभिनेत्री)
स्थळ : सिल्व्हर पेटल्स हॉल, लाडली साडी सेंटरजवळ,
धायरी फाटा, सिंहगड रोड, पुणे.
रविवार दिनांक 18 ऑक्टोबर 2026 - वेळ : सायंकाळी 4 ते 8
अधिक माहितीसाठी : 7276314142 / 8605284272

दैनिक **आरंभपर्व**
आरंभ एका नव्या पर्वाचा

पुर्ननिर्मितीतून प्रगतीकडे...!
**पुणे प्रहार**

पुणे प्रहार यांच्या सहयोगाने

## दै. आरंभ पर्व आयोजित

# संपादक संमेलन

## लवकरच

प्रतिष्ठित संपादक करणार पत्रकारांना मार्गदर्शन

स्थळ : पुणे

